**नियमित फौजदारी खटला क्रमांक १६३/२०२२**
**निशाणी क्रमांक -१५/क**

सरकारतर्फे साक्षीदार क्रमांक १ ची जबानी

| | | |
|---|---|---|
| माझे | - | सागर नामदेव शिंदे |
| वय वर्षे | - | ३६ |
| धंदा | - | अथर्व टुर्ल्स ॲन्ड टॅव्हर्स |
| राहणार | - | रा. पेठ वडगांव, आंबा रोड, ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर |

**सरतपास सरकारी वकील श्री.व्ही.पी.कुसुरकर यांच्यातर्फे** -

१. माझे sagagshinde105@gmail.com च्या नावाचे Facebook account आहे. हे म्हणणे खरे आहे की, दि.२२/०१/२०२२ रोजी मला माझ्यास नावाचे दुसरे Facebook account दिसले होते. त्या दुस-या अकौंन्टला माझे फोटो दिसून आले होते किंवा कसे हे मला आठवत नाही. दुस-या अकौन्टचे URL https://www.Facebook.Com/profile.php?id =100076889425161 असे होते किंवा कसे हे मला माहीत नाही.

**सदरचा साक्षीदार त्याच्या पूर्वीच्या जबाबाव्यतिरिक्त कथन करुन लागलेने सहा. सरकारी अभियोक्ता यांच्या मौखिक विनंतीनुसार सदर साक्षीदारास उत्तर सुचक प्रश्न विचारण्याची परवानगी अभियोग पक्षास देण्यात येत आहे.**

२. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीने FB व Whats up accout माझ्या नावाने काढून व त्यावर फोटो लावून लोकांना शिवीगाळ व बदनामी करणारे Messages पाठविले होते. हे म्हणणे खरे नाही की, त्या दुस-या Facebook Account वर URL असणा-या Facebook वर वडगांव हद्दीतीती राज पाटील यांचा फोटो भावपूर्ण श्रध्दांजली म्हणून पोस्ट केला होता.

३. हे म्हणणे खरे नाही की, Facebook Account वरुन वडगांव शहरातील प्रतिष्ठीत व्यक्तींना त्यापैकी भूषनराव सालकर यांना ये लवड्या, कोण तू ये लवडया तुझ्या आईची गांड वगैरे अशा वाईट वंगाळ शिवीगाळ केलेबाबत मजकूर पोस्ट केला होता. हे म्हणणे खरे नाही की, दि.२४/०१/२०२२ रोजी तक्रारी अर्ज दाखल केला होता.

४. हे म्हणणे खरे नाही की,दि.१९/०२/२०२२ रोजी सायंकाळी ४.३० वा चे सुमारास सोशल मिडीयाचे Whatup Number 8591519102 वर Whatsup Account काढून त्यावर माझा फोटो लावून वडगांव शहरातील प्रतिष्ठीत प्रवीण माने यांना शिवीगाळी करुन दमदाटी केली. हे म्हणणे खरे नाही की, सदरचे FB व whatsap चे Messgage आरोपी आकाश राजेंद्र मिरजकर यांनी पाठविले होते.

५. हे म्हणणे खरे नाही की, दि.२४/०३/२०२२ रोजी रात्री ७.३० वाचे सुमारास

८५९१५१९१०२ या नंबरचे Whatsup अकाऊट काढून त्यावर माझा फोटे लावून वडगांव शहरातील अक्षय माने यांना राज पाटील यांच्या नादाला लागु नकोस, नाहीतर तुला सोडणार नाही असे म्हणून शिवीगाळ करुन दमदाटी केलेली आहे.

६. आता मला दि.२५/०३/२०२२ रोजीचा माझा जबाब दाखविण्यात आला. त्यावर माझी सही आहे. त्यास **नि. १६** देण्यात येत आहे. परंतू पोलीसांनी सांगीतल्या प्रमाणे माझा जबाब घेतलेलो नाही. आता मला " दि.२२/०१/२०२२ दुपारी........... *शिवीगाळ करुन दमदाटी केलेली आहे.''* त्यास **अधोरेखांकीत भाग अ** देण्यात येत आहे. सदरचा मजकूर माझा जबाबामध्ये का नमूद आहे, त्याचे कारण मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे नाही की, पोलीसांनी मी सांगीतल्या प्रमाणे माझा जबाबामधील मजकूर लिहून घेतलेला आहे. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी व माझ्यामध्ये कोर्टाच्या बाहेर तडजोड झालेली आहे. आता मला **नि. १४** तडजोड पुरसीस दाखविण्यात आली. त्यावर माझी सही आहे. मला पुढे केस चालवायची नाही. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीला वाचविण्याकरीता मी आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

**सरतपास संपला.**

उलटतपास आरोपीतर्फे वकील श्री.एस.एल.बोभाटे यांनी नाकारला.

श्रवणोत्तर स्वीकृती

Sd/-

(आर.एस.मोरे)

दि. ०९/०६/२०२६ प्रथमवर्ग न्यायदंडाधिकरी, पेठ वडगाव